# सफर बागलाणची...



रोहित जाधव

# * सफर बागलाणची..... *

## प्रस्तावना

"सफर बागलाणची" यात आहे. यशवंतराव महाराजांचे सर्व २१ अध्याय त्यानंतर यशाची गाथा मिरवणारे बागलाण तालुक्यातील २५ किल्यांची माहिती ज्या लोकांमुळे आज आपले वैभव टिकले आहे. त्यांचे श्रध्दास्थान असलेले ११ मंदिरे तसेच तालुक्याची थोड्याबहुत प्रमाणात तहान भागविणारे चार धरणे व थकलेल्या जिवनातुन आराम मिळावा व निसर्गाचे अदभुत व रहस्यमयी दर्शन व्हावे व त्याचा सहवास मिळावा असे चार पर्यटन क्षेत्रे.

धार्मिक अध्यात्मिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, निसर्गाची साथ लाभलेल्या,देवतेंचा आशिर्वाद लाभलेल्या संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महापुरुषांच्या आशिर्वादाने परिपुर्ण झालेल्या, स्वतःची एक वेगळी ओळख, वेगळी बोलीभाषा, कणखर,धाडसी व तेवढाच मनमिळाऊ माणुस घडविणाऱ्या बागलाणची थोडक्यात ओळख ''सफर बागलाणची ''यातुन आम्ही आपणासमोर मांडत आहोत.

।। सोमेश बाबेश महेश तुंगेश यशवंत रातीव पवित्र देशे
श्री मोक्षगंगा तटहंस मीढे व्यक्तं जगत् रक्षतु श्री उध्दवेशम् ।।

# सफर बागलाणची

## संकलन व लेखन
## दुर्गवीर प्रतिष्ठान,बागलाण

देणगी मूल्य – ६०/-

प्रथम अवृत्ती, प्रकाशन–२०१५

(सदर रक्कम गड, किल्ले,प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाकरिता वापरण्यात येईल.)

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



दामाजीचे यशवंतरूपे पुन्हा अवतरणे



श्री अक्कलकोट स्वामींचे
बाळ यशवंताला दर्शन



श्री यशवंतराव महाराज
चाळीसगांवचे मामलेदार झाले

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



यशवंतराव महाराजांनी
गरीब ब्राम्हण स्त्री ला
पैठणी नेसायला दिली




यशवंतराव महाराजांचा
राजीनामा परत घेण्यासाठी
सखाराम महाराजांचे
श्री स्वामी समर्थांना साकडे



श्री यशवंत कृपेने
रौद्र समुद्र शांत झाला.

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



कावडी बाबने श्री यशवंत देवांचा गंगेच्या वाळवंटात अभिषेक केला.

श्रींनी काशिच्या गंगेची
कावड रामेश्वर क्षेत्री
गाढवाला पाजली व
जिवनदान दिले.र





सत्रा पाटील यांना
अनंतसिंग रुपाने
श्री हरीने रुपये दिले.


# श्री यशवंतराव महाराज अध्याय



श्री यशवंत देवाने
सत्रा पाटीलाला भाव समाधीत नेले.

बाईने नवसाचा नारळ यशवंतरायांच्या
डोक्यावर धरताच नारळाचे
दोन तुकडे झाले.





बाळ माधवनाथाच्या आईने
त्यांना श्री चरणी घातले.

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



दुष्काळात यशवतंराव महाराजांनी सटाण्याचा सरकारी खजिना गोरगरीबांना वाटला.



यशवंतराव महाराजांची टाळमृदुंगाच्या गजरात भक्तांनी मिरवणूक काढली.



उपासणी महाराजांना दिक्षा दिली.

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



यशवंतराव महाराजांची शिंदे सरकार व ब्रिटीश गर्व्हनरने पालखीतुन मिरवणूक काढली.

यशवंतराव महाराजांना उकळत्या पाण्याने अंघोळ.





सितारामाला सहस्त्र दळी-विवर दर्शन घडविले.

# श्री यशवंतराव महाराज अध्याय



श्री माधवनाथ महाराज व
शिलानाथ महाराज यांना उपदेश दिला.



श्रीदत्त महाराज यतीवेशाने
आईसाहेबास नेत आहे.



नाशिकला
श्री यशवंतराव महाराजांची
समाधी.

## यशवंतराव महाराज कर्मयोगी संत होते, त्यांचा शिष्य परिवार

१) श्री माधवनाथ महाराज (चित्रकूट–इंदौर)

२) श्री गोंदवलेकर महाराज (गोंदवले–सातारा)

३) श्री पदमनाभाचार्य स्वामी (टेंभूवडे–पालघर)

४) श्री नारायण महाराज (चांदोरी)

५) श्री उमाचरण महाराज (सदानंद–पंढरपूर)

६) श्री सिताराम झिलू मयेकर बाबा (सुकळवाड–सावंतवाडी)

७) श्री संत गंगागिरी महाराज (सरलाबेट–श्रीरामपूर)

८) श्री नानावली महाराज (चांदवड)

९) श्री गजानन महाराज (शेगांव)

१०) श्री हरिभाऊ महाराज (स्वामीसुत–मुंबई)

११) श्री उपासणी महाराज (साकोरी)

१२) श्री ब्रम्हनिष्ठ वामनबुवा (वांबोरी–अहमदनगर)

# श्री यशवंतराव महारांचा परिचय

* १३ ऑगस्ट १८१५ – यशवंतराव महाराज यांचा ओमकारवाडा घर क्र.११८ पुणे येथे जन्म.
* शिक्षण :- भोसे ता.पंढरपूर येथे मराठी ७ वी पर्यंत शिक्षण पुणे येथे ४ इंग्रजी शिक्षण.
* विवाह :- वयाच्या १२ व्या वर्षी शिवाजी बापुजी देशपांडे रा.टेंभुर्णी ता.करमाळा यांची कन्या सुंदराबाई (वय वर्षे६) हिचेशी विवाह.
* नोकरी :- १८३१ वयाच्या १६ व्या वर्षी येवला येथे कारकुनाची १० रुपये महिना प्रमाणे तात्पुरती नोकरी. नंतर ५ रुपये वाढ करुन पारनेर येथे बदली पारनेर येथे ५ वर्षे नोकरी नंतर कर्जत तालुका कचेरी खजिनदार म्हणुन ५ वाढ करुन २० रुपये महिन्यावर नियुक्ती.
* सन १८४५ घोडनदी जिल्हा पुणे येथे सहाय्यक कलेक्टरचे चिटणीस म्हणून नियुक्ती वेतन २० प्रति महा.
* सन १८४६ कानळदे ता.नशिराबाद येथे महालकारी म्हणून नियुक्ती प्रथम वेतन ३५ रुपये नंतर ४५ रुपये
* सन १८५१ चाळीसगांव,जिल्हा जळगांव येथे मामलेदार म्हणून नियुक्ती वेतन ८० रुपये दरमहा
* सन १८५३-५४ अमळनेर येथे मामलेदार म्हणून बदली वेतन १२५ दरमहा

* सन १८५६-५७ एरोंडल तालुक्यात बदली वेतन १७५ रुपये नंतर पुन्हा अमळनेर येथे बदली, दानधर्म केल्याने लोक तेथेच देवमामलेदार म्हणू लागले.नंतर तेथील काही द्वेष करणाऱ्या लोकांनी वरिष्ठांकडे खोट्या तक्रारी केल्याने दहा महिने निलंबीत. चौकशी अंती निर्दोष सुटका.

*८ मे १८६९ सटाणा येथे बदली येथे दुष्काळ पडला असता १ लाख २७ हजार रुपयांची वाटप त्यावेळी अन्नदान केल्याने महाराजांना वैयक्तिक १५ हजारांचे कर्ज.

*सन १८७१ इंदौरचे श्रीमंत तुकोजीराव यांचे महाराजांना निमंत्रण.

*सन १८७५ यशवंतरावांनी मुल्हेरहुन महालक्ष्मी सटाण्यात आणली.

*सन १८८१ तुकोजीराव होळकरांनी महाराजांच्या खाजगी खर्चासाठी १०००/- रुपये तरतूद केली.व १५०००/- रुपये देऊन कर्जमुक्त केले.

*सन १८८४ निजाम सरकार यांनी महाराजांची सदिच्छा भेट घेतली.

*११ डिसेंबर १८८७

वयाच्या ७२ व्या वर्षी मार्गशीर्ष वैद्य एकादशी वार रविवार रोजी वैकुंठवास.

# बागलाणचा इतिहास

बागलाणलाच पुर्वी खान्देश म्हणत या भागावर अभिर राजांची सत्ता होती या अभिरांनी श्रीकृष्णाला महाभारतात मदत केली होती. श्रीकृष्णांची कृपादृष्टी याभागावर असल्यामुळे याला कान्हादेश असे म्हणत पुढे या अपभ्रंश होऊन खान्हदेश झाला. जिने कृष्णालाच नवरा मानला अशी एक वर ठेवणारी एकविरा ही देवी खान्देशी लोकांची कुळदैवत बनली व या दोघांची आठवण म्हणून आजही या भागात कानबाईची प्रथा आहे. कृष्णाची बायको म्हणजे कान्हाबाई तेच पुढे कानबाई झाले. ह्या एकविरेचे प्रथम मंदिर जैतापुर या ठिकाणी बांधले गेले. त्यानंतर रुख्मिणी मातेच्या मुळगावी अमरावती येथे नंतर धुळे येथे बांधले गेले. बागलाणची राजधानी महाभारत काळात म्हणजे (७५०० वर्षे) यावेळी मुल्हेर होती त्यावेळी मयुरध्वज राजा राज्य करत होता. त्याच्या नावावरुन रत्नपुर हे नावबदलून मयुरपुरी हे नाव ठेवले गेले.

मयुरध्वज हा कृष्णसखा होता. व त्याने कृष्णाची आठवण म्हणून मुल्हेर येथे रासक्रिडा चालु केली. जी आजतागायत चालु आहे. अभिर राजांची भाषा अभिरवाणी म्हणजेच अहिराणी होती. ही भाषा संस्कृत (प्राकृत) गुजराती राजस्थानी मारवाडी व मराठी या भाषांपासून बनली आहे. या भाषेला सुध्दा ७५०० वर्षाचा इतिहास आहे. अभिर राजांना गवळीराजे म्हणत त्यांनी चौल्हेर पिसोळ व गवळण हे तीन किल्ले बांधले

प्राप्त इतिहासानुसार या भागात इ.स.७५ साली गौतमी पुत्र सातकर्णी या राजाची सत्ता होती तसेच नहपान राजाच्या ताब्यात बागलाण व लोहोणेर होते. इ.स.४१६ मध्ये गवळी राजांचे राज्य होते त्यांनी वाडीचौल्हेर यास राजधानी केले. इ.स.७८५ ते ८१० या काळात बागलाण वर राष्ट्रकुटांचे राज्य होते. इ.स.८३० ते १०३६ या काळात कृष्णराज या कलचुरी चालुक्यांचे राज्य होते. याच काळात १००६ मध्ये देवळाणे येथे कामदेव जोगेश्वराचे मंदिर बांधले गेले. १०८९ मध्ये सौराष्ट्रातील यादवपुत्र दृढ प्रहार याने मुल्हेर येथे आपली राजधानी केली. काही काळ याचा वंश याभागावर राज्यकर्ता झाला. पुढे इ.स.१३०८ साली कनोज येथील राठोड (बागुल) यांनी राज्य केले. अशा या बागुल राजांचे १३०० ते १७०० या कालखंडात ५४ राजे होऊन गेले. त्यापैकी राजा मालुगी याने हुमायुनचा पराभव केला होता. याच राजांच्या नावावरुन या प्रदेशास बागलाण म्हटले गेले. यांच्या काळात तलवारी मुठीचा विशेष घाट तयार झाला जी मुल्हेरी मुठ म्हणून जगप्रसिध्द आहे. भारतरत्न विश्वेश्वरय्या यांनी आवर्जून गौरवलेले मोसम ,पांझरेवरील बंधारे १३६० साली नानदेव राठोडाने बांधले होते. इ.स.१६१० साली मुल्हेर किल्यावर मराठीतील सर्वात मोठा ग्रंथ कथा कल्पतरु लिहीला गेला. पुढे १६७२ साली साल्हेर येथे प्रसिध्द मोकळ्या जागेतील लढाई झाली,व इंग्रजांच्या काळात भिलवाड सत्याग्रह गाजला होता.

इ.स.१८६९ मध्ये बागलाण प्रांताचे विभाजन होऊन अहमदनगर व नाशिक असे दोन जिल्हे तयार झाले व नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुका टाकण्यात आला. पुढे इ.स.१८७५ मध्ये पुन्हा बागलाण तालुक्याचे विभाजन होऊन सटाणा व कळवण असे दोन स्वातंत्र्य तालुके निर्माण करण्यात आले.पुढे १९५० मध्ये संस्थान विलीणीकरण कायद्यांतर्गत सुरत जिल्ह्यातील वाघंबा व साल्हेर ही दोन गावे बागलाण तालुक्याला जोडण्यात आली.

ऐतिहासिक पुराव्यांमध्ये बागलाणच्या नोंदी –कथा कल्पतरु (१५८०) , राष्ट्रोढ वंश महाकाव्यम (१५८५), राधा माधवविलास चंपू,ऐन–ऐ–अकबरी, बादशाहनामा (औरंगजेब), बुधभुषणम् (संभाजी महाराज), शिवभारत,आज्ञापत्र, सभासद बखर.

## बागलाणची भुरचना –

बागलाणचा भुप्रदेश हा दख्खणच्या पठाराचा लहानसा भुभाग आहे.जो कठीण व काळ्या अग्निजन्य खडकापासून बनलेला आहे.या पठाराची पश्चिम कडा तीव्र उताराची असून त्यास सह्याद्री असे म्हणतात. सह्याद्री पर्वत रांगाचा उगम बागलाणातुनच होतो त्यात सेलबारी व डोलबारी असे दोन प्रकार पडतात.

### १) डोलबारी डोंगररांग –

त्यात येणारे किल्ले :– मुल्हेर, मोरागड, हरगड, जिभ्या, सुळका, साल्हेर, साल्होटा, भिलाई, पाचपांडव, निळवा (मोठा व्यास, सपाट पठार)

२) चणकापुर डोंगररांग :-

देरभावजय,चौल्हेर,प्रेमगिरी,पिंपळादुर्ग

३) सेलबारी डोंगररांग :-मांगीतुंगी,नाव्हीगड,तांबोळ्या,

कोथमिऱ्या,गवळण,धामण,हनुमानगड,शेंदवड गड (उंचसुळके)

४) हिंदळबारी-गाळणा डोंगररांग

पिसोळ,डेरमाळ,गाळणा,कंक्राळा

५) दुंधा डोंगररांग :- फोफिर,दुंधा,अजमेरा,कऱ्हा,बिष्टा

सेलबारी डोंगररांगेतुन हिंदळबारी व दुंधा डोंगररांग सुरु होते.

## बागलाण मधील पीके :-

उस,गहु ,बाजरी,डाळिंब,कांदे,मका,भात,

वरळी,नागली ,(साल्हेरपट्टा)

बागलाण मधील वन्यजीव :- कोल्हे,रानडुक्कर,बिबटे,वानर,मोर

बागलाणमधील वृक्ष :कडूलिंब,बाभुळ,आंबा,अर्जुन,खैर,कदम्ब,

वड,पिंपळ,पळस(लाल,पांढरा) गुलमोहर,

बागलाण मधील वनस्पती :- अश्वगंधा,शतावरी,गुळवेल,

हरणखुरी,जंगली कोरफड,मातीसुळ


बागलाणमधील नद्या :- गिरणा,मोसम,आराम,करंजाडी,

कान्हेरी,हत्ती (यासर्व नद्या तापी नदी जलप्रणालीत येतात.)

# बागलाण मधील किल्ले

## १) साल्हेर किल्ला व त्याची भौगोलिक माहिती





## १) साल्हेर किल्ला :-

(साल्हेर /सालगिरी / गवळीगड / शैल्यगिरी / महेंद्रगिरी)

* महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला * परशुरामाची तपभुमी

* मंदिर -

परशुराम मंदिर ,रेणूका मंदिर,मोक्षगंगा मंदिर (मोसम नदीचा उगम) अक्षगंगा मंदिर (आरम नदीचा उगम) ,साल्हेर कुलस्वामिनी गड कालिका माता मंदिर, भुयारी गणेश मंदिर, अमृताभवानी माता मंदिर, हनुमान मंदिर.

* समाधी –

सुर्यराव काकडे समाधी व आनंदराव समाधी.

*शिलालेख –

यादव कालीन शिलालेख, फारशी शिलालेख

उंची :-

५२९५ फुट ,चढण कठीण

* जाण्याचे मार्ग–

सटाणा–डांगसौंदाणे–तताणी–केळझर–साल्हेर–

अंतर – ४८ कि.मी.

* पाण्याचे टाके –

चंदन टाका, गणेश टाका, सुर्याजी टाका, छील विहीर, गंगासागर तलाव, गंगाजमुना टाके,


**साल्हेर किल्ला :-** महाराष्ट्रात जसा सर्वाच उंच शिखराचा मान कळसूबाईचा तसा गड किल्यांमध्ये सर्वाधिक उंचीचा मान साल्हेरचा बागलाण हा मोक्षगंगा आणि अक्षगंगा या नद्यांमुळे समृध्द झालेला प्रदेश येथील भुमी तशी सुपीकच व त्यामूळे तेथील लोकांचे राहणीमान थोडे उंचावलेले. तरीही डोंगरी भागात कोकणा, भिल्ल, यासारख्या आदिवासी जमाती राहतात. साल्हेर गडाचा घेरा साधारणपणे ११ कि.मी.असून व्यापलेले क्षेत्र ६०० हेक्टर आहे.

**इतिहास :-** साल्हेर गड हा परशुरामाची तपोभुमी म्हणुन प्रसिध्द आहे. जिंकलेल्या पृथ्वाचे दान करुन स्वतःसाठी भुमी मिळविण्यासाठी सागराला मागे हटवायला त्यांनी बाण सोडला. तो याच भुमीवरुन असे पौराणिक स्थान असलेल्या साल्हेरचे शिवकालीन इतिहासातील स्थान देखील महत्वाचे आहे. ते येथे झालेल्या प्रसिध्द लढाईमुळे. शिवरायांनी १६७१ मध्ये बागलाण मोहीम काढली आणि साल्हेर जिंकुन घेतला. या मोहिमेची वार्ता औरंगजेबाला कळाली. व तो कष्टी झाला. सभासद बखरीत या युध्दाचा उल्लेख खालील प्रमाणे आढळतो. ४ प्रहर युध्द जाहले. मोगल, पठाण, रजपुत, तोफांचे, हत्ती, उंट आराबा, घालुन युध्द झाले. युध्द होताच पुथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोस औरस-चौरस , आपले व परके लोक मानुस दिसत नव्हते. हत्ती रणास आले दुतर्फा दहा हजार मानुस मुर्दा जाहले. पुर वाहले. रक्ताचे चिखल जाहले. त्यामध्ये रुतो लाभले, असा कर्दम जाहला. मराठ्यांनी इखलासकान आणि बेलोलखानाचा पाडाव केला. युध्दात प्रचंड प्रमाणावर हानी जाहली. या युध्दात शिवरायांच्या

१ लाख २० हजार सैन्याचा समावेश होता. पैकी दहा हजार माणसे कामी आली तर मुगलांचे १ लाख २५ हजार सैन्य मारले गेले होते. ६ हजारघोडे ६ हजार उंट १२५ हत्ती तसेच खजिना जड जवाहिर, कापड अशी मालमत्ता शिवरायांच्या हाती आली होती. या युध्दात मावळ्यांनी पराक्रमाची शर्त केली. मोरोपंत पेशवे, प्रतापराव सरनौबत यांनी आणीबाणी केली. व शिवरायांचे लहान पणापासूनचे सवंगडी सुर्यराव काकडे यांना पराक्रम गाजवतांना आपला देह ठेवावा लागला. ते तोफेचा गोळा लागुन पडले सुर्यराव काही सामान्य योध्दा नव्हे. महाभारती जैसा कर्ण योध्दा त्याचा प्रतिमेचा, असा शुर पडला. समोरा–समोर लढाई करुन तोपर्यंत महाराजांना विजय प्राप्त झाला होता. त्यात साल्हेरचा विजय प्रथम मानावर होता. असा मोठा विजय यापूर्वी कधीही मिळाला नव्हता. या युध्दात महाराजांच्या लोकांनी दाखविलेले युध्दकौशल्याची व शौर्याची किर्ती चहुकडे पसरली व त्यांचा दरारा अधिकच वाढला. त्यामूळे सुरत शहरास कायमची दहशत बसली.

# २) मुल्हेर किल्ला व त्याची भौगोलिक माहिती






## २) मुल्हेर :- ( मौरेर/मालगिरी/मयूरगिरी)

* महाभारत कालीन मयूरध्वज राजाने बांधला
*७५०० वर्षांचा इतिहास
* मोरेश्वर गणपती मंदिर
* सन १५४० साली बांधलेले सोमेश्वर पाताळ मंदिर
* राम लक्ष्मण मंदिर
*अडभंग नाथ मंदिर मोरेश्वर गणेश मंदिराजवळ
*सन १६३२ चा राजा प्रताप शहा बागुल यांचा शिलालेख
*अडंभगानाथ समाधी जवळ १७५७ चा शिलालेख
*भद्र राजाचा राजवाडा

टाके :- *मोतीटाका * गणपती तलाव *हत्ती टाका *गुलाब टाका *गंगा तलाव * यमुना तलाव *नवटाके

लेणी :- ३५०० वर्षापुर्वीच्या भिक्षू लेणी



सोमेश्वर महादेव मंदिर, मुल्हेर

# 3) हरगड



४) मोरागड :- * उंची -४४५० फुट * क्षेणी -मध्यम

* राजवट-हिंदु

हरगड:- * उंची ४४२० फुट * क्षेणी -मध्यम फ

* राजवट-हिंदु

(मुल्हेर,मोरा,हरगड) यास त्रिगिरी म्हणतात.


जाण्याचा मार्ग :-सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-मुल्हेरवाडी-मुल्हेर किल्ला

अंतर - ३४ कि.मी.

**मुल्हेर किल्ला :-** विजय नगरमध्ये हिंदुसत्ता प्रस्थापित होण्यापुर्वी किती तरी अगोदर बागलाण मध्ये हिंदु सत्ता प्रस्थापित होती. अकबराने जेव्हा खान्देशचे राज्य जिंकले तेव्हा प्रतापशहा बहिरजी बागलाणचा राजा होता. जुलै १६३६ ला औरंगजेबाची दक्षिणेचा राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. इ.स.१६३८ मध्ये मुगलांनी बागलाणवर हल्ला केला आणि मुल्हेर किल्ला जिंकुन त्याचे नाव औरंगगड असे ठेवले. १५ फ्रेब्रुवारी १६३८ रोजी वैभवशाली हिंदुचे राज्य संपुष्टात येऊन तेथे मुगलांची सत्ता प्रस्थापित झाली व किल्यावर महम्मद ताहीर याची किल्लेदार म्हणून नेमणूक झाली. या ताहिराने मुल्हेरजवळ ताहीर नावाचे गाव बसविले. व कालांतराने ताहिराबाद असे नामकरण झाले. पुढे इ.स.१६६२ मध्ये मुल्हेर किल्यामधील सैनिकांनी अपुऱ्या पगारासाठी बंड केले. व दुसऱ्या सुरत लुटीनंतर शिवाजी महाराजांनी बागलाण मोहीम उघडली व १६७१ मध्ये मुल्हेर किल्ला जिंकला पुढे १७५२ च्या भालकीच्या तहानुसार मुल्हेर व खान्देशमधील सर्व प्रदेश मराठ्यांच्या हाती आला त्यानंतर त्र्यंबक गोविंद मुल्हेरचा किल्लेदार झाला. १७६५ मध्ये किल्यावर भरपूर गुप्तधन मिळाल्याच्या नोंदी पेशवे दप्तरात आहेत. अशा रितीने १५ जुलै १८१८ रोजी हा किल्ला ब्रिटीशांच्या तावडीत सापडला.

# ५) तिळवण किल्ला






**तिळवण :- (चौल्हेर / चौरंग / चाल्होरी)**

साल्हेरचा जुळा भाऊ :- उत्कृष्ठ स्थापत्य शास्त्राचा नमूना

टाके- मोती टाके, शेवाळ टाका,

उंची :- ३७०० फुट क्षेणी-मध्यम

जाण्याचा मार्ग -सटाणा-खमताणे-तिळवण किल्ला

अंतर :- १२ कि.मी.

# ६) हनुमान गड



**६) हनुमानगड :-** हनुमानाचे मंदिर,प्रस्तारोहनासाठी उत्तम
जाण्याचा मार्ग :-सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-हनुमंतपाडे
अंतर - ४० कि.मी.




## ७) कोथमिऱ्या


जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-कोथमिऱ्या

दऱ्हाणे,कोथमिऱ्या,व तिळवण हे किल्ले एका रांगेत जोडून उभे आहेत. या पैकी दऱ्हाण्याचा डोंगरावर शेंड्यांवर आया-माऊलींचे स्थान आहे. वर जाण्याचा रस्ता अतिशय खराब आहे. कोथमिऱ्या डोंगरावर कुठल्याही प्रकारचे ऐतिहासिक वास्तू नाहीत. याचा उपयोग फक्त टेहाळणी करता होत असेल व तिळवण किल्यावर समृध्द राजवट होती.

# साल्होटा



# पिसोळ



**८) साल्होटा** :– महाराष्ट्रातील सर्वात उंच ३ क्रमांकाचा किल्ला


* राणीचा किल्ला म्हणून ओळख

* उंची ४२५० फुट * चढाई –कठीण

मार्ग :–सटाणा–ताहाराबाद–मुल्हेर–वाघंबा–साल्होटा किल्ला

**९) पिसोळः**– श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्यावर रामटाके उंची :– ३५०० फुट * क्षेणी –मध्यम * जाण्याचा मार्ग– सटाणा–ताहाराबाद–जायखेडा–वाडीपिसोळ–पिसोळ किल्ला अंतर :– ३६ कि.मी.

# पांडव गड



## १०) पांडव गड :-

जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-वाघंबा

## ११) पिंपळा गड :-(कंडाणा)

जाण्याचा मार्ग:-सटाणा-डांगसौंदाणे-सावरगांव-मोहबारी-पिंपळागड

# बिष्टा :-(बिजोटा)



## १२) बिष्टा :-(बिजोटा)

किल्यावर सुंदर लेण्या * उत्तम बांधकाम

उंची -३३७५ फुट *श्रेणी-मध्यम

जाण्याचा मार्ग :- सटाणा-कोटबेल-बिजोटा

अंतर :-२४ कि.मी.

# डेरमाळ



**१३) डेरमाळ :-** महाभारत कालीन भिमाने वसविलेला किल्ला सुंदर गुहा व भरपूर पाण्याचे टाके उंची :-३७०० फुट, श्रेणी-मध्यम

जाण्याचा मार्ग :- सटाणा-नामपूर-बिलपुरी-डेरमाळ किल्ला

अंतर :- २८ कि.मी.

# न्हावीगड (रतनगड)



**१४) न्हावीगड (रतनगड) :-**प्राचीन बांधकाम दगडी पायऱ्या व पाण्याचे टाके १८ भुटा देवीचे प्राचीन मंदिर उंची ४१०० फुट श्रेणी मध्यम

जाण्याचा मार्ग:-सटाणा-ताहाराबाद-मांगीतुंगी-वडाखेल-पातळवाडी-न्हावीगड

# दुंधागड



**१५) दुंधागड :-** प्राचीन ,सुंदर पाण्याचे टाके

उंची –२२८० फुट, श्रेणी –मध्यम


जाण्याचा मार्गः–सटाणा–अजमिर सौंदाणे–तळवाडे–दुंधे–दुंधागड

अंतर :– १८ कि.मी.

**१६) कऱ्हेगड :-** स्थापना :– १३ वे शतक, किल्यावर पाण्याचे टाके व मंदिर श्रेणी–मध्यम

जाण्याचा मार्ग –सटाणा–कऱ्हे

अंतर –७ कि.मी



**१७) देरभावजय :-** सदर किल्ला शापित असल्यामुळे वर जाता येत नाही. पण निसर्गचा अदभूत चमत्कार बघण्यासारखा आहे.

जाण्याचा मार्ग –सटाणा–तिळवण–देरभावजय

अंतर :– २० कि.मी.

## १८) तांबोळ्या :- (ताम्रगड)

जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-तांबोळ्या

मुल्हेर पासून ३ कि.मी

मुल्हेर किल्या समोरील गड़ :- शत्रूच्या हालचाली लक्ष ठेवण्यास सदर किल्याचा उपयोग होत असे. किल्यावर एक पडित मंदिर असून बाकी काही नाही. पुर्वी किल्यावर एक तोफ होती पण आता काहीच नाही.

## १९) घाण्यागड :-

वालुकामय (संपूर्ण वाळुचा किल्ला) इतिहास बलरामाने श्रीकृष्णाच्या शोधाकरिता वसविललेला (मांगीतुंगी जवळ) .

अंतर :- सटाण्यापासून ३४ कि.मी.

## २०) धामण्या :-

जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-धामण्या

धामनगड , गवळण गड, शेंदवड गड,कंसेरा गड, न्हावी गड,हे किल्ले सह्याद्रीच्या डोंगररांगात सुटे-सुटे उभे असल्यामूळे या किल्यांवरुन आजबाजूचा विस्तृत प्रदेश दिसतो. त्यामूळे या किल्यांचा उपयोग फक्त टेहाळणी करता करण्यात आला होता या किल्यांचा आकार व उंची पाहता तेथे फार कमी सैन्य व शिबंदी राहत असावी.

## २१) गवळण :-

जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-गवळण

## २२) शेंदवड गड :-

जाण्याचा मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-शेंदवड गड

# बागलाणचे तीर्थक्षेत्र



**१) कपार भवानी :-** हरगड किल्याच्या पाठीमागे असलेल्या किल्यात,डोंगराच्या कपारीत ६५ फुट आत अष्टभुजा देवीची स्वयंभु मुर्ती तसेच कपारीच्या बाहेर १२ महिने वाहनारा धबधबा, इतिहास-शिवचरित्रात दोन वेळा उल्लेख , १४ व्या शतकात स्थापना, निसर्गाचा गुढ व अदभूत चमत्कार

मार्ग :- सटाणा-मुल्हेर-जामोटी

अंतर :-३८ कि.मी.



**२)आशापुरी माता:-**भवानी देवीचे प्राचीन स्थान,नरकोळ

मार्ग :- सटाणा-केरसाणे-नरकोळ

अंतर - ३० कि.मी.

# भिलाई




**२३) भिलाई :-** भिलाई देवीचे प्राचीन मंदिर

उंची- ३४७८ फुट

श्रेणी - मध्यम

जाण्याचा मार्ग :-सटाणा- डांगसौंदाणे (तताणी फाटा)-दगडी साकोडे - भिलाई अंतर :-२८ कि.मी.

# अजमेरा (पहाडेश्वर)



**२४) अजमेरा (पहाडेश्वर) :-** प्राचीन व श्रीमंत शहर, वर देवीचे एक मंदिर

उंची -२५०० फुट , श्रेणी :- मध्यम

जाण्याचा मार्ग :- सटाणा-अजमिर सौंदाणे-पहाडेश्वर-अजमेरा

अंतर :- ६ कि.मी



**३) जैतापुर -एकविरा माता :-** एकविरा देवीचे स्थान, जैता राणीच्या गावावरुन गावाला नाव एकविरा देवीची स्वयंभु मुर्ती ,राजा नानदेवाने १४ व्या शतकात वसविले कंसरा देवीचे प्राचीन मंदिर इ.स.१७६५ भग्नवस्थेत गणेश मंदिर (इ.स.१६००)

**श्री मुरारी पंडित,समाधी मंदिर :-** आपली विद्वता, मोहकवाणी व नम्रता या गुंणांमुळे संपूर्ण खान्देश व गुजरात मध्ये उध्दव महाराजांची महती पोहचली होती. उध्दव महाराजांना भेटण्या अगोदर मुरारी काशी येथे शिकण्यास होते. त्यांच्या विद्वतेचा गौरव तेथील विद्वानांनी केला होता. व त्यांना दिवसा मशाल लावून ब्राह्मनांनी पालकी वहावी असा मान होता. याचा मुरारींना अंहकार झाला होता.ते प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथील शास्त्री पंडितांना वाद विवादाचे आवाहन देत. व हरविल्यानंतर त्यांच्या नावाचा दोर पायात घालत असे करत दोऱ्यांची बंधने गुडघ्या पर्यंत भरली होती. पण उध्दव महाराजांसमोर ते हरले व उध्दव महाराजांची शिष्यत्व स्विकारुन आपले नाव मुरारी उध्दव असे ठेवले. त्यांची समाधी जैतापुर येथे आहे. त्यांचे निर्वाहन इ.स.१७६५ च्या सुमारास झाले. मुरारी उध्दव यांचा शिष्य परिवार फार मोठा होता.

मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-हरणाबारी-धरण-जैतापुर

अंतर :- ४० कि.मी.

**२५) कंक्राळा :-** पुर्वी बागलाणचे प्रवेशद्वार असलेल्या गाळणा टेकडीत होता. पण आता मालेगांव तालुक्यात गेला. एकदा बघण्यासारखा आहे.

सुंदर व भव्य दरवाजे ,प्राचीन गुहा,पाण्याचे टाके

जाण्याचा मार्ग :- मालेगांव-करंजगव्हान-कंक्राळा

**२६) कन्हेरवाडी :-**(कान्हेरा)- पुर्वी बागलाण मध्येच यायचा पण आता कळवण तालुक्यात आहे.

जाण्याचा मार्ग-सटाणा-पिंपळदर-बेज-ओतूर-कन्हेरवाडी

अंतर :- ३६ कि.मी.

## फोफिर



**२७) फोफिर :-** फोफिर किल्यावर फोफेश्वराचे मंदिर असून किल्याची उंची व त्याच अभेदय पणा पाहता त्याचा उपयोग फक्त टेहाळणी करता होत असावा. वर जाण्यास रस्ता नसून पायवाट आहे. फक्त काही ठिकाणी दगडी पायऱ्या दिसतात.

मार्ग :- सटाणा-दोधेश्वर-बिजोटे-फोफिर

अंतर :-३० कि.मी.

उध्दव महाराज समाधी



## ४) मुल्हेर शहर :-

उध्दव महाराज समाधी संस्थान (१७५० साली) काशिराम नाईक यांच्या जवळ सन ८८० सालचा सैद्रिक राजाचा ताम्रपट

२१०० वर्षापुर्वीची श्री प्रद्युम्न नारायणाची मुर्ती उध्दव महाराज मंदिरात आहे.

श्री काशिराज महाराज :- (१५९९ ते १६७९) श्री काशिराज महाराज हे साक्षात योगेश्वर वशिष्ठ ऋषिंचा अवतार होते. त्यांचे मुळ गांव जाड (मुल्हेरच्या पश्चिमेस १० कि.मी) त्यांचे वडील श्री.लक्ष्मण शारंगधर पंडित. ते प्रताप शहाच्या पदरी विशेष पुरोहित होते. काशिराजांचा जन्म इ.स.१५९९ साली झाला. लहानपणीच संस्कृत फारशी भाषेचा विशेष अभ्यास त्यांनी केला. शिवाय अर्थकारणावर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. वयाच्या १७ व्या वर्षी बहिरम शहा राजा असतांना ते आमात्य झाले. आपल्या ज्ञानाच्या प्रभावाने सुमारे १२ वर्षापर्यंत त्यांनी प्रजेस सौख्य दिले व राज्य समृध्द बनवले. श्री काशिराजांचा प्रभाव सर्वत्र होत असता त्यांच्या विरोधातही कायवाया चालुच होत्या अशाच एका कारवाईत बहिरम शहाने श्री काशिराजांना साल्हेर किल्यावर कैदेत ठेवले. त्यावेळस काशिराजांना दुष्टांत झाला की, तु अखंड राम नामाचा जप कर त्यांच्या जवळ जपास माळ नव्हती काशि राजांनी आपला फेटा मोकळा करुन त्यास गाठी मारल्या व त्याची माळ करुन अखंड

नामाचा जप सुरु केला. व इकडे बहिरम शहा राजास दुष्टांत झाला कि, काशिराजास मुक्त करावे. अन्यथा फार हानी होईल. तेव्हा राजाचा विजय नावाचा पांढरा हत्ती आवडता घोडा, कलावती नावाची गणिका, प्रमुख गुप्तहेर हे अल्पकाळात नष्ट झाले. हे विघ्न पाहुन राजा घाबरला व त्याने काशिराजांना मुक्त करुन क्षमा मागितली. काशिराजांनी हरगडावर २१ गणपतींची स्थापना केली. श्री काशिराजांनी जिवनभर आदिवासी व गरिब लोकांची सेवा केली.

२) श्री उध्दव महाराज :– श्री उध्दव महाराजांचा जन्म भाद्रपद शु.९ इ.स.१६४६ रोजी झाला. उध्दव महाराजांचे मुळ नाव शिवबा असे होते. शिवबा वयाने लहान असला तरी तेथील साधु संताच्या मेळाव्यात उत्साहाने आवडीने भजन करीत शिवबास साक्षात काशि विश्वेश्वराने स्वप्नात येऊन सांगितले की, तु मयुरपुरास जा तेथे श्री काशिराजांना भेट ते तुला पुढील मार्ग दाखवतील. वयाच्या ७ व्या वर्षी शिवबा पोरका झाला. त्यामूळे काशिराजांनीच त्यांचा पुढील सांभाळ केला. एकदा सुमारे इ.स.१६६० साली श्री रामदास स्वामी मुल्हेर येथे आले. श्री समर्थांच्या सहवासात त्यांच्या व्यक्तिमहत्वाने व नैष्ठिक ब्रह्मचार्याचरणाने १४ वर्षाचा शिवबा प्रभावित झाला. त्यांनी समर्थांना आपणावर कृपा करावी अशी विनंती केली. तेव्हा समर्थांनी त्यांना उद्देश केला व रामाचा त्रयोदशाक्षरी मंत्रही दिला. व काशिराज हेच तुला सदगुरु आहेत असेही सांगितले. शिवबाने ते शिरसावंद्य मानुन ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय केला. व १६६१ साली श्री रामदासांनी उध्दव महाराजांचे नाव शिवबा असे बदलुन उध्दव ठेवले. साधारण इ.स.१६७० च्या सुमारास श्री उध्दव उत्तरेत यात्रेस निघाले. साधारण ३ वर्षे‌ते उत्तरेत होते. वाटेत त्यांनी अनेक ठिकाणी समाज प्रबोधन

केले. श्री उध्दव महाराजांनी गुरु काशिराजांच्या उपदेशावर लक्षुन ५५०० ओव्यांनी सजलेल्या १३ पोथ्या तसेच ११२५ अभंग व स्फूट काव्यांची रचना केली. तसेच ज्ञानेश्वर महाराजांच्या दृष्टांताने स्वात्मबोध ही टिका लिहीली. तसेच एकनाथ महाराजांच्या दुष्टांताने भक्ती प्रकाश हा ग्रहंथ लिहीला. त्यांची मते प्रखर होती.

श्री उध्दव महाराजांनी ऐतिहासिक रासोत्सव चालु केला. मयुरनगरात रासक्रिडा उध्दव महाराजांच्या आधिपासून साजरा होत असे. ऐतिहासिक पुराव्या नुसार मुल्हेरची रासक्रिडा सुमारे ७०० वर्षापुर्वी पासून आहे. स्थानिक अख्यायिकेनुसार हा उत्सव महाभारत कालिन मुल्हेर राजा मयुरध्वज याने इ.स.पुर्व ५००० सुमारे सुरु केला. राजा मयुर ध्वजाचे राज्य नर्मदेच्या दक्षिण भागात होते. व राजधानी मुल्हेर येथे होती. पांडवांच्या आश्वमेघ यज्ञाच्या वेळी नर्मदा ही त्यांच्या दिग्वीजयाची सिमा निश्चित करण्यात आली. अर्जुन श्रीकृष्णासह नर्मदातिरी अश्व घेऊन आला. त्याच वेळी मयुर ध्वजाचाही अश्वमेध यज्ञ सुरु होतो. त्याचा अश्व १६ वर्षाचा मुलगा ताम्रध्वज सांभाळत होता. अर्जुनाने नर्मदेच्या दक्षिण तिरावरील राज्य (मुल्हेर) मिळविण्याची इच्छा श्रीकृष्णाजवळ प्रगट केली. मयुरध्वजही कृष्णभक्त होता. त्याचा मुलगा ताम्रध्वज याने आपल्या बाणाच्या वर्षावाने अर्जुनाचा पराभव केला.

शेवट श्रीकृष्णाने युक्ती करुन मयुरध्वजा कडून मुल्हेर नगरीत अर्जुनाचा अश्व फिरविला. व राजा मयुरध्वजास दर आश्विनी पोर्णिमेस रासक्रिडा उत्सव सुरु करण्याचा वर दिला. तेव्हापासून मुल्हेर येथे श्रीकृष्णाची आठवण म्हणून रासोत्सव चालु आहे. एवढेच नाहीतर श्री उध्दव महाराजांनी आपले निरवाणा नंतरचे स्थान या

जागेजवळ असावे अशी इच्छा केली म्हणून उध्दव महाराजांची समाधी ही रासस्तभां समोर आहे. श्री उध्दव महाराजांनी सुध्दा जन्मभर भिल्ल, आदिवासी लोकांची सेवा केली. उध्दव महाराजांना प्रत्यक्ष भागिरथीने गंगेत स्नान घातल्या नंतर आजही दर १२ वर्षांनी समाधीवर हा साक्षात्कार अनुभवास येत असतो. आजपर्यंत समाधीवर २४ वेळा भागिरथी प्रगट झाली आहे. (अलीकडे स्नान दि.२७/९/२००४ रोजी घातले होते)

स्वामींचे ५ प्रमुख शिष्य होते.

१) गोवर्धनदास (इ.स.१६८० ते १७४०) गोवर्धनदासांचे मुळ नांव गणेशभट्ट जोशी उध्दव महाराजांनी त्यांना आश्रय दिला. व त्यांचे पालन पोषण केले. तेही ब्रह्मचारीच होते. महाराजांच्या सहवासात तेही थोरभक्त झाले. श्री गोवर्धन महाराजांनी शिवरायांबरोबर गिरणेच्या काठी गणपतीची स्थापना केली.

२) श्री माधवदास ( इ.स.१६९५ ते १७५०) :-हे महाराजांच्या मामेभावाचे नातु हेही लहानपणीच उध्दव महाराजांजवळ राहण्यास आले. तेही ब्रह्मचारी होते. श्री माधवदास नेहमी देवपूजा करीत. एकदा गडबडीत आरतीच्या वेळी माधवदासांनी श्री रामास गरम दुधाचा नैवैद्य दाखविला व आरती केली. दुसऱ्या दिवशी श्रीराम मुर्तीच्या तोंडास गरम दुधाचा चटका बसून फोड आलेला दिसला.

मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर

अंतर :-३४ कि.मी

३) श्री कमलनयन स्वामी (इ.स.१६५८ ते १७५०) :- हे महाराजांचे तिसरे शिष्य होते. श्री नयनमहाराजांनी जवळ-जवळ ६२५ अभंग, २८ स्त्रोत्र व १५ आरत्या लिहील्या अहिराणी भाषेतही त्यांच्या काव्या रचना आहेत.

''आरती उध्दवेशा व आरती संतजन या दोन्ही आरत्यांनी रचना नयन महाराजांनीच केली आहे. नयन महाराज हे उत्तम वैद्य होते. त्यांना संजीवनी मंत्राचा योग येत असे. त्यांनी मृत मुलावर संजीवनी योग करुन त्यास पुन्हा जीवंत केले होते. महाराजांची वैद्यकिय किर्ती सर्वत्र पसरली. मुल्हेरच्या किल्लेदाराने त्यांना त्यांच्या बेगमची तब्बेत पहाण्यास बोलावले व सांगितले की, बेगम तुमच्या हातात हात देणार नाही. तर हाताला एक लांब दोर बांधून तिच्या नाडीची परिक्षा करा. सात पडद्या आडून स्वामींनी दोर हातात घेतला व सांगितले की, बेगमला ऋतुकाल आहे. त्यांना रेडा दाखवा हे पाहून किल्लेदार घाबरला कारण त्या ठिकाणी बेगम नव्हती तर म्हशीच्या पायाला दोरा बांधला होता. हे पाहून किल्लेदार महाराजांचा शिष्य बनला श्री उध्दव महाराजांच्या निजधामानंतर दावल-मलिक यांना उध्दवांच्या मार्गास आणन्यास नयन महाराज हेच कारणीभुत होते.

४) श्री मुरारी पंडित :- आपली विद्वता, मोहकवाणी व नम्रता या गुंणांमुळे संपूर्ण खान्देश व गुजरात मध्ये उध्दव महाराजांची महती पोहचली होती. उध्दव महाराजांना भेटण्या अगोदर मुरारी काशी येथे शिकण्यास होते. त्यांच्या विद्वतेचा गौरव तेथील विद्वानांनी केला होता. व त्यांना दिवसा मशाल लावून ब्राह्मनांनी पालकी वहावी असा मान होता. याचा मुरारींना अंहकार झाला होता.ते प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथील शास्त्री पंडितांना वाद विवादाचे आवाहन देत. व हरविल्यानंतर त्यांच्या नावाचा दोर पायात घालत असे करत दोऱ्यांची बंधने गुडघ्या पर्यंत भरली होती. पण उध्दव महाराजांसमोर ते हरले व उध्दव महाराजांची शिष्यत्व स्विकारुन आपले नाव मुरारी उध्दव असे ठेवले. त्यांची समाधी जैतापुर येथे आहे. त्यांचे निर्वाहन इ.स.१७६५ च्या सुमारास झाले. मुरारी उध्दव यांचा शिष्य परिवार फार मोठा होता.

५) श्रीकृष्णदास :- माधव दासांच्या बरोबरीने यांनीही मोठे कार्य केले. व पुढे कृष्णदासांनीच संस्थान चालविले. त्यांची समाधी अंबड बीड येथे आहे.

श्री उध्दव महाराज राजकीय भेटी / पत्रव्यवहार

| | |
|---|---|
| १. छत्रपती संभाजी राजे | (१६८३/८४) |
| २. श्रीमंत बाजीराव पेशवा (प्रथम) | (१७२०) |
| ३. बादशहा औरंगजेब | (१७०४/१७०५) |
| ४. बहरोज खान (बागलाण सुभेदार) | (१६९२/१७०२) |
| ५. त्र्यंबकराव दाभाडे | (१७२१) |

## चिराई माता



**५) चिराई माता :-** अर्धनटेश्वरी देवीचे प्राचीन मंदिर

मार्ग :- सटाणा-नामपूर-चिराई

अंतर :- ३८ कि.मी



**७) बहिराणे :-** सिध्देश्वर महादेव मंदिर बागलाण तालुक्यातील सर्वाधीक प्राचीन मंदिर राजा बहिरम शहा राठोड (बागुल) याने १६१६ साली या मंदिराची स्थापना केली. राजा बहिरामाच्या नावावरुन या गावास बहिरामने म्हटले जात असे पूढे त्याचा अपभ्रंश होवून बहिराणे हे नाव पडले. मंदिराच्या बाजूला सौंदड वृक्ष आहे.

मार्ग :- सटाणा–नामपूर–टेंभे–बहिराणे अंतर :- ३५ कि.मी.




**८) आलियाबाद :-** १५०० वर्षापुर्वीचे लखुलीश पध्दतीचे सुंदर नक्षीकामाचे १२ बाय १२ चे महादेव मंदिर

मार्ग :- सटाणा–ताहाराबाद–मुल्हेर–आजंदे–आलियाबाद

अंतर :- ४२ कि.मी

# संत श्री सदगुरू शंकर महाराज


## ६) अंतापूर :-(अनंतपूर)

१) शंकर महाराज - शंकर महाराजांच्या जन्मस्थान महाराज एक सिध्द पुरूष होते. ते एकाच वेळी अनेक ठिकाणी दिसत. महाराजांचे कार्य फार मोठ्या प्रमाणावर होते. त्यांचे अवतार कार्य पुणे येथे समाप्त झाले.त्यांची समाधी घनकवडी, पुणे येथे आहे. सटाण्यातील खुप लोकांचे श्रध्दास्थान आहेत.

२) दावल मलिक :- हे दोन संत हिंदू-मुस्लीम ऐकाचे प्रतिक आहेत. भारतातील हजारो लोक दरवर्षी येथे येत असतात. दावल-मलिक ह्या दोन्ही संतानी आदिवासी बांधवांची फार मोठ्या प्रमाणात सेवा केली अनेक नव येथे फेडले जातात. गुरुवारी कंदूरीचा कार्यक्रम येथे फार मोठ्या प्रमाणात होतता.दावल-मलिक हे उध्दव महाराजांचे शिष्य होते.

इतिहास :- राजा अनंतेश (इ.स.१४ चे शतक) अनंतपूर ही नगरी वसवून उत्तम प्रकारे राज्य केले ह्या अनंतपूरचा अपभ्रंश पूढे अंतापूर असे झाले.

मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-अंतापूर

अंतर :- ३० कि.मी



**१०) देवळाणे :-** देवळाणे येथील मंदिर राजा सिंघना या यादव कालीन राजाने इ.स.१००० या शतकात बांधले या मंदिरास कामदेव जोगेश्वर मंदिर असे म्हणता. मंदिर पुर्वी दुमजली होते पण आता एक मजली असून छताला रंगकाम केले आहे. मंदिर हे माडपंथीय नागरी पध्दतीच्या बांधणीचे आहे. मंदिराला ५ कळस असून दर्शनी भागात उत्कृष्ठ शिल्प कोरलेली आहे. मंदिरावरील प्रत्येक शिल्प उच्च कोटीचे अध्यात्मज्ञान प्राप्त करुन देते.दर्शनी भागाच्या डाव्या बाजूच्या दूसऱ्या खांबावर छोटा शिलालेख कोरलेला आढळतो. मंदिरात एकूण हाजाराच्यावर शिल्प कोरलेली आहेत.

मार्ग :- सटाणा-अजमिर सौंदाणे-देवळाणे

अंतर :- १२ कि.मी



**१)बाभेश्वर :-** केदारेश्वर महादेव मंदिर/विश्वेश्वर महादेव मंदिर मंदिराची प्राचीनता व तेथील स्थिती महादेवाच्या पिंडीवरूनच लक्षात येते पिंड केदारनाथ सारखी त्रिकोणी असून मंदिराचा घाट सुध्दा त्रिकोणी आहे.

बाभेश्वर हे मंदिर राजा सोमदेवाने १४ व्या शतकात बांधले मंदिर त्रिकोनी घाटाचे असून मोसम तीरी आहे.आतील शिवलींग सुध्दा त्रिकोणी आहे. मंदिराच्या बाजूस एक विना मुर्तीचे पडित मंदिर आहे. तेथील विष्णूमुर्ती धनेरांभळी येथील मंदिरात आहे. आजही ह्या झोपलेल्या विष्णूमूर्तीच्या नाभीतून पाणी वाहत आहे. हा निसर्गाचा एक अदभूत चमत्कारच म्हणावा लागेल. बाभेश्वर मंदिराच्या सभा मंडपाचे काम गोविंद कृष्ण पाठक कल्याणकर यांनी बुधवार दि.८ जून १७९५ या साली बांधला असे तेथील मंदिराच्या बाहेरील शिलालेखा वरुन कळते.

शिलालेख खालील प्रमाणे :-

'' श्री बाभेश्वराच्या आज्ञेवरुन गोविंद कृष्ण काटक कल्याणकर यांनी देवालय व सभामंडप बांधीले असे विद्यमान रामचंद्र कृष्ण काटक कल्याणकर मिती जेष्ठ वद्य ७ शके १७१७ राक्षस नाम संवत्सरे जेष्ठ वद्य ८ बुधवार देवालयाची सिध्दी झाली असे'ड्ड

पण मंदिराच्या बाहेरील दूमजली दगडी सभामंडप १९६९ च्या पूरात वाहून गेला सध्या फक्त त्याचे अवशेष तेथे दिसतात.

टिप :- सदर मंदिर मोसम नदी किनारी असल्यामूळे फक्त दुचाकी मंदिरा पर्यंत जाते मंदिर पाहण्यास पावसाळ्यात जावू नये मंदिरा पर्यंत जाण्यास रस्ता खराब आहे. व बाजूला रस्त्याच्या कडेला विहीरी आहेत.

तेथील आदिवासी बांधवांचे ते प्रमूख दैवत आहे. पण विहीरी खोदण्याच्या निष्काळजी पणामूळे धोका आहे. मंदिर एकदा बघावे असे नक्कीच आहे.

मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-बाभेश्वर

अंतर :- ३६ कि.मी.



**११) कपालेश्वर :-** अज्ञाता वासात असतांना पाच पांडवांपैकी नकूल कडून लिंगाची स्थापना * केवड्याच्या वनामुळे व कोसळणाऱ्या धबधब्यामुळे प्रसिध्द


मार्ग :- सटाणा–मुंजवाड–कपालेश्वर


अंतर :- १४ कि.मी



**१२) भिमाशंकर :-** अज्ञात वासात असतांना भिमाकडून लिंगाची स्थापना ,महादेवाच्या पिंडीतुन भिवरी–शिवरी नदीचा उगम

मार्ग :- नामपूर–श्रीपुरवडे–भिमाशंकर





प्रस्तावित १०८ फुट ऋषभदेव भगवान मुर्ती

# १३) मांगीतुंगी दिगंबर जैन तिर्थक्षेत्र

श्री क्षेत्र मांगीतुंगीजी हे एक क्षेत्र असे आहे की जेथे ९९ कोटी मुनी मोक्षाला गेले आहेत. आजही ती प्राचीनता या उत्तुंग पहाडातुन पाहीली जात आहे. अशी कैवल्य-ज्योत धारण करणारे व चिरकालीन संचित कर्माला भस्म करुन अनंत सौख्याला प्राप्त करणारे तपोनिधी येथुनच मुक्तीपदाला पोहोचले आहेत. त्यांचे वंदनीय चरणकमल देवदेवतांनी आपल्या मुकुटावर प्रतिबिंबित केले आहे. असे श्रीरामचंद्र, हनुमान, सुग्रीव, सुडील, गव, गवाक्ष, नील, महानील, क्रमशः ९९ कोटी मुनी ज्यांना दिगंबर तरण -तरण ऋषी म्हणतात, अशा महात्म्यांनी शुद्धात्म योग येथे धारण करुण यथास्थान येथेष्ट चिदानंद चिद्रुप स्वरुप अविकार अमुर्तिपद प्राप्त केले आहे. निजानंद रसात लवलीन झाले. आशा सिद्धात्मांच्या सिद्धीमुळेच या परमपावन भुमीचे नांव सिद्धक्षेत्र मांगीतुंगीजी  असे पडले आहे. श्री मांगीतुंगीजी या एकाच पर्वताचे मांगी व तुंगी हे दोन शिखरे आहेत जे गगणचुंबी असुन एका अद्वितीय नैसर्गिक शोभेला धारण करणारे आहे. त्यामुळे याचा आकार प्रकारसुध्दा एका विशिष्ट रचनेने स्वयंपुर्ण बनला आहे. ज्यामुळे येथे अनेक कलावंताचे कॅमेरे खेचले जातात. आणि मग फोटोच या क्षेत्राची किर्ती जगभर पसरवितात. झाकलेले मोती ज्याला म्हणतात त्यापैकीच हे एक सिद्धक्षेत्र आडवळणामुळे थोडे मागासलेले राहिल्यासारखे वाटले. वास्तविक याचा इतिहासच अघटित घटनांनी व नाना चमत्कारांनी भरलेला आहे. ओसंडुन वाहत आहे.

मार्ग :-सटाणा-ताहाराबाद-मांगीतुंगी

अंतर :-३४ कि.मी




**१४) प्राचीन खंडेराव महाराज मंदिर भाक्षी :-** श्री खंडेराव महाराजांच्या चरित्रात भाक्षी या तीर्थक्षेत्राचा दोन वेळा उल्लेख होतो. श्री खंडेराव महाराज व बानाई मातेच्या विवाहानंतर त्यांच्या अनेक वर्षाचा सहवास या भागात होता. वर डोंगरावर खंडेराव महाराजांच्या घोड्याच्या टाा आहेत दरवर्षी चंपाषष्टी ला तेथे यात्रा भरते. येथील खंडेराव नवसाला पावणारे सटाणाच्या लोकांचे एक भक्तीस्थान आहे.

मार्ग :- सटाणा-भाक्षी अंतर :-४ कि.मी



**१५) ठेंगोडा :-** गणपती मंदिर :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या हाताने बसविलेली , सिध्देश्वर गणपतीचे जागृत स्थान मार्ग :- सटाणा-ठेंगोडा अंतर :- ८ कि.मी.



**१६) दोधेश्वर** :- अज्ञात वसात असतांना पाच पांडवांपैकी युधिष्ठीराने या लिंगाची स्थापना केली. दोधेश्वर या स्थानी पाच महादेव लिंग आहेत. त्यांचा उल्लेख शिव पंचायतन या ग्रंथात असा आहे.-वारुळात झाडाचे मुळ सापडले म्हणून मुळेश्वर,मुळाला वेल आला म्हणून वेलेश्वर,वेलीला फुल आले म्हणून फुलेश्वर,फुलाचे फळ झाले म्हणून फळेश्वर, फळातुन दुधा सारखा रस बाहेर आला म्हणून दुग्धेश्वर

वैशिष्ट्ये :- पदम्पुरानात दोधेश्वरचा उल्लेख असा- इतिश्री पद्मपुराणे । सह्याद्री राशे गिरीजा धर राशे । दुग्धेश्वर अधिष्ठानायम चतुर्दश अध्याय संपूर्णम । तसेच १३ व्या अध्यायात तर मानवाच्या मृत्यु नंतर उत्तरक्रिया पिंडदान आदि धार्मिक क्रियाकर्म करण्यासाठी दोधेश्वर हे अत्यंत पवित्र स्थान असल्याचा उल्लेख आहे.हे निसर्गरम्य ठिकाण नवसाला पावणारे आहे.

मार्ग :- सटाणा-भाक्षी-दोधेश्वर

अंतर :- ७ कि.मी




## १७) महालक्ष्मी मंदिर सटाणा :- सन १८७५

इतिहास :- सद्याची महालक्ष्मी मुर्ती मुल्हेर येथील गणेश तलावात सापडलेली होती. तेथील लोकांनी महालक्ष्मी व प्रद्युम्न नारायण तलावातुन बाहेर काढून किल्यावरील एका झाडाजवळ ठेवल्या होत्या. सन १८७५ मध्ये विष्णुदास महाराजांनी महालक्ष्मी व नारायण प्रतिष्टापने करिता विष्णुयाग यज्ञ केला. व त्या यज्ञाच्या यजमान पदी श्री देवमामलेदार यशवंतराव महाराज होते.त्यांनी ती महालक्ष्मी सटाण्यात आणली तेव्हा पासून खऱ्या अर्थाने सटाण्यात ऐश्वर्य आले.

वैशिष्ट्य :-आपली महालक्ष्मी व कोल्हापुरची महालक्ष्मी यात काहीच फरक नाही आहे.दोघी देवींच्या कपाळावर महादेवाची पिंड आहे. डोक्यावर नागफणी आहे.एका हातात म्हाळुंग फळ आहे. तर दुसऱ्या हातात पानपात्र आहे. एका हातात ढाल तर दुसऱ्या हातात गदा रुपी शस्त्र आहे. दोघी देवींवर वर्षातुन एकदा सुर्यनारायणाचा किरणोत्सव होतो. आपल्या देवीची मुर्ती तैलेंगी पाथरी पाषाणाची आहे. म्हणजे साधारण ५००० वर्षापुर्वीची घडण.ही देवी नवसाला पावणारी आहे.

## १८) मांडवगड :- आदिवासी बांधवांचे दैवत, डोंगऱ्यादेवचे गुहेतील स्थान

यात्रा :- कार्तिकी पोर्णिमा

मार्ग :- सटाणा -डांगसौंदाणे-तताणी-घुलमाळ-मांडवगड


अंतर :- ४० कि.मी




## १९) मुंजवाड कृष्ण मंदिर :-

सदर मंदिर १९९९ साली लोक वर्गणीतुन बांधले आहे. मंदिर बागलाण तालूक्यातून कोठून ही दिसते एवढे भव्य आहे. मंदिराला खूप जुना इतिहास तसा नाही फक्त कृष्णभक्ती म्हणून तेथे भेट देवू शकता.

मार्ग :- सटाणा-मुंजवाड अंतर :- २ कि.मी.






**२०) उपासनी महाराज :-** जन्म १५/०५/१८७०,समाधी दि.२४/१२/१९४१ सटाणा नगरी श्री.प.पु.उपासनी महाराजांच्या जन्माने पावन झाली व सटाण्यात श्री.उपासनी बाबांच्या जन्मा निवासी भव्य असे १२ ज्योर्तिलिंग,श्रीराम,हनुमान, व दत्त महाराजांच्या देवालयाची उभारनी केली. अशा या जागृत देवस्थानात शुध्द भावनेने सुचिर्भुत होऊन सोहळ्यात नित्यपुजन केले जाते. जो भक्त विनम्रतेने आपली मनोकामना येथे प्रकट करतो ती मनोकामना श्री बाबांच्या कृपेने पुर्ण होते. असे हे बाबा प.पु.श्री साईबाबा यांचे एकमेव परमशिष्य होते. साईबाबांनी श्री.बाबांना सर्व सिध्दी प्राप्त करुन दिली. श्री बाबांनी यशवंतराव महाराजांच्या मांडीवर व्रतबंध संस्कार घेतले व गायत्री महा मंत्राचा अनुग्रह घेतला  श्री बाबांनी साकुरी येथे कन्याकुमार स्थानाची स्थापना केली. कन्यांना वेदाध्यायन शिकवले. गोरगरीबांची सेवा केली.अशा या श्री उपासनी महाराजांची सटाणा, नागपूर, सुरत,हैद्राबाद ,मुंबई,
खडकपुर,नाशिक,भोरगड,शेगांव,अशा अनेक ठिकाणी आश्रम आहेत.अशा या श्री उपासनी महाराजांची महती वर्णावी तिथकी थोडीच आहे. श्री बाबांनी असे म्हटले आहे की, ''मी पार्थिव शरीराने नसलो तरी मी नाही असे नाही मी अजरामर आहे. मी जेथे तेथे तुम्ही ''असे वाक्य बाबांनी भक्तांना सांगितले आहे.





## २१) पदमनाभस्वामी समाधी मंदिर विरगांव :-

इतिहास :- राजा विरसेन (इ.स.पूर्व ३ रे शतक) ह्याने ही नगरी वसविली व त्याच्या नावावरुन वीरगाव हे नाव पडले राजा वीरसेनाने पुत्रप्राप्ती नंतर दोधेश्वराच्या मंदिरास भरपूर धन दिल्याचा उल्लेख जुण्या पुस्तकात आढळतो.

पदमपूराणात वीर सेनाच्या दानाचा व दोधेश्वराच्या मंदिराचा उल्लेख येतो.इ.स.१६८० साली पदमनाभ स्वामींनी वीरगाव येथे संत श्री तुकाराम महाराजांचे आज्ञेवरुन महाराष्ट्रातील पहिले भागवत पारायण येथे केले.त्यानंतर नाशिक येथील काळाराम मंदिरात.समाधी मंदिर आवारात १००० च्या वर भागवत पारायणे झाली आहेत. अशा ह्या पवित्र जागेस प्रत्येक धार्मिक माऊलींनी भेट देणे गरजेचे आहे. समाधी मंदिराचे अध्यक्ष अतिशय निगर्वी व धार्मिक वृत्तीचे आहेत.व मंदिराचा कारभार सुर्यप्रकाशा सारखा स्वच्छ आहे.




**२२) हिडींबा माता मंदिर :-** (हिंदळबारी) १) पांडव कालीन इतिहास २) भिम व हिडींबा यांचे विवाहस्थान ३) निसर्गरम्य व अदभूत असे ठिकाण (आयुष्यात एकदा नक्की बघावे )

मार्ग –सटाणा–नामपूर–श्रीपुरवडे–भिमाशंकर–टिंगरी–हिंदळबारी

टिप :- येथे पर्यंत जाण्यास रस्ता व्यवस्थित नाही. पण दुचाकी जाऊ शकते.

अंतर :- २८ कि.मी.




## १) हरणबारी :- नदी-मोसम

मार्ग :- सटाणा-ताहाराबाद-मुल्हेर-हरणबारी

अंतर :- ३८ कि.मी.



## २) दसाणे :- नदी-हत्ती

मार्ग :-सटाणा-दसाणे अंतर :- ३० कि.मी.



## 3) जाखोड :- नदी-करंजाडी

मार्ग :- सटाणा-केरसाणे-जाखोड अंतर :- २८ कि.मी.


# * पर्यटन क्षेत्रे *



**१) डांगसौंदाणे :-** टेकडी गणेश मंदिर , जायबारी धबधबा ,दरेभणगी महादेव मंदिर , निळवा डोंगरातील सातकप्पा लेणी स्वरुपातील प्राचीन सप्तशृंगी मंदिर व जलदुर्गा माता मंदिर.

मार्ग :-सटाणा-डांगसौंदाणे

अंतर :- २४ कि.मी



**२) साल्हेर:-** केळझर,साळवण ते साल्हेर विस्तीर्ण दाट जंगल अनेक औषधी वनस्पती व झाडे वन्य जीवांचा वावर उदा-बिबटे,तरस, मार्ग :- सटाणा-डांगसौंदाणे-तताणी-केळझर-साल्हेर अंतर :- ४८ कि.मी.

## * पर्यटन क्षेत्रे *





## ३) यशवंतराव महाराज स्मारक :-

(पेशवेवाडा) - १८१० चे बांधकाम

हस्तांतरण :- पेशवे -इस्ट इंडिया कं.


इंग्लडची राणी-भारत सरकार-देव मामलेदार यशवंतराव महाराज ट्रस्ट कडे.



**४) भवाडे :-** उंच-उंच पर्वत रांगावर वसलेले बागलाण तालुक्यातील शेवटचे गांव ,सुंदर व निसर्गरम्य,उंच उंच धबधबे,गर्द हिरवळ, दाट जंगल एकदा भेट द्यावी असे जंगल.

मार्ग :- सटाणा-तळवाडे-भवाडे

अंतर :-३२ कि.मी.


सटाणा
कळवण



## ४) केळझर :-

नदी–आराम

मार्ग– सटाणा–डांगसौंदाणे–केळझर,

अंतर –३६ कि.मी.



**५) आव्हाटी :-जंगल**– दुर्मिळ व औषधी वनस्पती तसेच वृक्ष, मार्ग :– सटाणा–विरगांव–आव्हाटी

अंतर :– १५ कि.मी.


## झाडे व त्यांचे उपयोग :-

१) अशोक-कधी शोक देत नाही.
२) सफेद पिंपळ (पाकड) - उत्तम स्त्री मिळते.
३) बेल -चांगले आयुष्य मिळते.
४) जांभुळ - धन प्रदाता
५) तेंदू- कुळवृध्दी होते.
६) डाळिंब - स्त्री सुख
७) बकुळी - पापनाशक
८) वंजुल(तिनीश) -बळवृध्दी
९) धातकी(धव) -स्वर्ग प्राप्ती
१०) वड -मोक्ष
११) आंबा -इच्छापुर्ती
१२) सुपारी - सिध्दीप्राप्ती
१३) अर्जुन -आरोग्य
१४) खैर -आरोग्य
१५) कदम्ब-लक्ष्मी प्राप्ती
१६) शतावरी-आरोग्य व लक्ष्मीप्राप्ती
१७) शमी-रोगनाशक
१८) केशर -शत्रुविनाशक
१९) सफेद वड-गुप्तधन
२०) पळस,पारिजातक-स्वर्गप्राप्ती
२१) पांढरा पळस-धन प्रदाता
२२) कडूलिंब -मुबलक पाणी
२३) चमेली-शत्रू विनाशक
२४) लाल गुलमोहर-संपत्ती दाता
२५) सोन मोहर-अतिदुर्मिळ, आरोग्यदायक,विजयश्री दाता

हि माहिती भविष्यपुरान, मध्यमपर्व भाग पहिला यात आहे.


झाडे लावण्याच महिने - वैशाख, आषाढ, श्रावण, भाद्रपद,

झाडे न लावण्याचे महिने - जेष्ठ, आश्विन, कार्तिक




१६७२ → गावे - १०००, लांबी -२०० मैल, रुंदी - १६० मैल

२०१४ → गावे - १८९, लांबी - ३२ मैल, रुंदी - २८ मैल




• डॉ० रघुराज पंडित यांच्या सौजन्याने

संपर्क
श्री. रोहित माणिक जाधव -९९२३५४१५०१
दुर्गवीर प्रतिष्ठान , बागलाण

# सफर बागलाणची...

